# भारतामधील महिलांमध्ये नेतृत्व विकसित करण्यात लिंग समानतेचे योगदान

प्रा. किर्ती विजय करंजावणे
राज्यशास्त्र विभाग
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौड रोड, पुणे
मोबाईल नं: ९७६७८४१४५२
ईमेल: karanjawanekirti26@gmail.com

**संशोधनाचा घोषवारा:**
लिंग समानता (Gender Equality) हा केवळ एक सामाजिक मुद्दा नसून, तो महिलांमधील सुप्त नेतृत्व गुणांना वाव देणारा मुख्य आधारस्तंभ कसा आहे, याचे विश्लेषण हा शोधनिबंध करतो. त्याचबरोबर भारतामधील महिला नेतृत्वाच्या उत्क्रांतीचा अभ्यास करण्यात आला आहे. लिंग विषमता संकल्पना, भारतातील लिंग असमानतेची सध्याची स्थिती, लिंग समानता संकल्पना, महिला नेतृत्व विकासात लिंग समानतेचे योगदान, भारतात महिला नेतृत्वाची विविध क्षेत्रातील स्थिती, भारतात महिला नेतृत्वासमोरील आव्हाने आणि अडथळे, भारतात महिला नेतृत्वासाठी उपाययोजना आणि धोरणात्मक शिफारसी, भारतातील महिला नेतृत्वाचा ऐतिहासिक ते आधुनिक युगातील प्रवास मांडून येणारा काळ हा महिलांचा आहे हे या शोधनिबंधातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.
**बीज शब्द** :लिंग समानता, लिंग विषमता, महिला नेतृत्व

**प्रस्तावना:**

नेहमी शिक्षणाच्या बाबतीत असे म्हणटले जाते की,"एका पुरुषाला शिक्षित केले तर एक व्यक्ती शिक्षित होते, पण एका स्त्रीला शिक्षित केले तर संपूर्ण कुटुंब शिक्षित होते." हे ब्रीदवाक्य केवळ शिक्षणाच्या बाबतीत लागू होत नाही तर नेतृत्वाच्या बाबतीतही तितकेच लागू होताना दिसते. भारताचा इतिहास पाहिला तर गार्गी, मैत्रेयी यांच्यापासून ते झाशीच्या राणीपर्यंत महिला नेतृत्वाच्या खुणा आढळून येतात. मात्र, भारतातील पितृसत्ताक पद्धतीमुळे हे नेतृत्व शतकानुशतके दाबले गेल्याचे पाहायला मिळते. कालांतराने मात्र लिंग समानतेच्या संकल्पनेने महिलांना शिक्षणाचे आणि समान संधीचे हत्यार प्राप्त झाले ज्यामुळे आज भारतीय महिला

राजकारण, अर्थकारण, विज्ञान, आणि क्रीडा क्षेत्रात जगाचे नेतृत्व करत आहेत. आज एकविसाव्या शतकात भारत जागतिक महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना, देशाच्या अर्ध्या लोकसंख्येला, म्हणजेच महिलांना मुख्य प्रवाहात आणणे अनिवार्य आहे. 'लिंग समानता' (Gender Equality) केवळ मानवी हक्कांपुरतानसून तो सामाजिक आणि आर्थिक विकासाचा कणा आहे. जेव्हा आपण महिलांच्या नेतृत्वाचा विचार करतो, तेव्हा राजकीय नेतृत्व म्हणजे केवळ राजकीय पदे भूषवणे असे नसून निर्णय प्रक्रियेत महिलांचा समान सहभाग असणे असा होतो.

**साहित्याचा आढावा:**

१. ‘लिंगभाव आणि भारतीय समाज’ डॉ. पुष्पा भावे यांचे हे पुस्तक डायमंड पब्लिकेशनने प्रकाशित केले असून या शोधनिबंधासाठी हे पुस्तक वापरलेले आहे. हे पुस्तक भारतीय सामाजव्यवस्थेत लिंगभाव ही संकल्पना कशी वापरली गेली त्याचबरोबर भारतातील पुरुषप्रधान संस्कृती उलगडून दाखवते.

२. ‘जात आणि लिंगभाव: भारतातील दलित महिलांचे प्रश्न’ शर्मिला रेगे यांचे हे पुस्तक श्रीविद्या प्रकाशनने प्रकाशित केले असून भारतातील दलित महिलांचे प्रश्न जात आणि लिंगभाव या अनुशंगाने या पुस्तकात मांडले आहेत. विशिष्ट जातीत लिंगभावही संकल्पना महिलांच्या दृष्टीने कशी वापरली जाते हे सांगितले आहे.

३. 'स्त्री-पुरुष तुलना' ताराबाई शिंदे यांनी लिहिलेले हे पुस्तक म्हणजे भारतीय पितृसत्ताक पद्धतीवर ओढलेले ताशेरे आहे. स्त्रीवाद आणि विशेषतः भारतीय स्त्रीवाद समजून घेण्यासाठी अतिशय महत्वाचा ग्रंथ म्हणजे 'स्त्री-पुरुष तुलना'' ग्रंथ आहे.

४. ‘भारतातील महिला नेतृत्व आणि सक्षमीकरण’ हे प्रमिला संघवी यांचे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊस या प्रकाशनाद्वारे प्रकाशित झाले असून हे पुस्तक महिला सक्षमीकरणातून कशा पद्धतीने महिला नेतृत्व उदयाला येते याची मांडणी करते; त्याचबरोबर महिला सक्षमीकरण ही संकल्पना, तिचे विविध आयाम स्पष्ट करते.

**लिंग विषमता संकल्पना**

‘लिंग विषमता’ हा शब्द ‘लिंग असमानता’ या शब्दाच्या बदल्यात वापरला जातो आणि तो लिंगानुसार लोकांना उपलब्ध असलेले परिणाम, संधी आणि संसाधनांमधील फरक दर्शविताना दिसतो. भारतात पितृसत्ताक मानसिकता आणि लिंग असमानता कायम असल्याने, महिलांना परस्परविरोधी भूमिका स्वीकारण्यास भाग पाडले जाते. मुली, माता, पत्नी आणि सुना या त्यांच्या पारंपारिक पालनपोषणाच्या भूमिका महिला प्रभावीपणे पार पाडतील याची खात्री करण्यासाठी स्त्रीची ताकद जागृत केली जाते त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला , "कमकुवत आणि असहाय्य स्त्री" ही

स्त्रियांची पारंपरिक प्रतिमा त्यांच्या पुरुष समकक्षांवर पूर्णपणे अवलंबून राहण्यासाठी जोपासली जाते.लिंग समानता आणि महिला सक्षमीकरणाच्या दिशेने काही महत्त्वपूर्ण कामगिरी करण्यात येत आहे तरी देखील खोलवर रुजलेले सामाजिक नियम, आर्थिक विषमता आणि राजकीय आव्हाने यामुळे भारतात लिंग विषमता अजूनही अस्तित्वात आहे हे देखील तेवढेच सत्य आहे.

आपल्या भारतीय समाजात जिथे महिला देवतांची पूजा केली जाते, तिथे महिलांना मात्र भेदभावाची वागणूक दिली जाते आणि त्यांना समान संधी नाकारली जाते. भारतातील लिंग असमानतेची सध्याची स्थिती खालील आकडेवारीवरून दिसून येते.

१. लिंग समानतेच्या बाबतीत भारत १४६ देशांपैकी १२७ व्या क्रमांकावर आहे असे एकूण लिंग असमानता:२०२३ च्या लिंग असमानता अहवालानुसार आढळून येते.
२. लिंग गुणोत्तर: राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (एनएफएचएस-५, २०१९-२१) नुसार, भारतातील एकूण लिंग गुणोत्तर प्रति १००० पुरुषांमागे केवळ १०२० महिला आहे. तथापी, जन्माच्या वेळी लिंग गुणोत्तर ९२९ इतके कमी राहिले आहे, यावरून जन्माच्या वेळी लिंग निवड, लिंग चाचणी चालू असल्याचे निदर्शनास येते.
३. मातृ मृत्युदर (एमएमआर): भारताच्या रजिस्ट्रार जनरलने जारी केलेल्या एमएमआरवरील विशेष बुलेटिननुसार, २०१८-२० या कालावधीत भारतातील एमएमआर प्रति लाख जिवंत जन्मांमागे ९७ आहे.
४. कुपोषण: NFHS-5 नुसार, १५-४९ वयोगटातील १८.७% महिला कमी वजनाच्या आहेत, १५-४९ वयोगटातील २१.२% महिला वाढ खुंटलेल्या आहेत आणि १५-४९ वयोगटातील जवळजवळ ५३% महिला अशक्त आहेत.
५. शिक्षण: NFHS-5 (२०१९-२१) नुसार, महिलांमध्ये साक्षरता दर ७०.३% आहे तर पुरुषांमध्ये हा दर ८४.७% असल्याचे आढळून आले आहे.
६. लिंग-आधारित हिंसाचार: NCRB च्या "भारतात गुन्हे" २०२१ च्या अहवालानुसार, २०२१ मध्ये महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांची ४ लाखांहून अधिक प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. ही आकडेवारी फक्त नोंदवलेल्या घटना दर्शवते, परंतु प्रत्यक्ष आकडेवारी खूपच जास्त आहे.
७. बालविवाह: NFHS-5 नुसार, २०-२४ वयोगटातील २३.३% महिला १८ वर्षांच्या आधी विवाहित होत्या किंवा विवाहित होत्या.
८. राजकीय विषमतेच्या बाबतीत बोलायचे झाल्यास सध्या, संसदेच्या एकूण सदस्यांपैकी (खासदारांच्या) फक्त १४.९४% महिला आहेत.
९. भारतीय निवडणूक आयोगाच्या अधिकृत आकडेवारीनुसार, डिसेंबर २०२३ पर्यंत, राज्य विधिमंडळांमध्ये एकूण सरासरी महिला प्रतिनिधित्व फक्त १३.९% आहे.

१०. एप्रिल २०२३ पासून पंचायती राज मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, पंचायती निवडून आलेल्या प्रतिनिधींपैकी सुमारे ४६.९४% महिला आहेत. त्यातही, 'सरपंच-पती' संस्कृतीचा प्रसार म्हणजे ही संख्या खूपच कमी असणार आहे.

**लिंग समानता संकल्पना:**

लिंग समानता म्हणजे स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये जो काही जैविक फरक आहे तो मान्य करून त्यांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्तरावर समान संधी उपलब्ध करून देणे. यूएन वुमन नुसार, लिंग समानता म्हणजे महिला आणि पुरुष, मुली आणि मुलांचे समान हक्क, जबाबदाऱ्या आणि संधी होय.

लिंग समानतेचा अर्थ असा नाही की महिला आणि पुरुष समान आहेत तर लिंग समानता म्हणजे पुरुष आणि महिलांचे हक्क, जबाबदाऱ्या आणि संधी त्यांच्या लिंगावर अवलंबून राहणार नाहीत असे ठरवून लिंग असमानता दूर करण्याचा केलेला प्रयत्न होय. लिंग समानता ही मानवी हक्कांचा मुद्दा आणि शाश्वत लोक-केंद्रित विकासाची पूर्वअट म्हणून मानली जाते. लिंग समानता समजून घेतानाच महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता यांच्यातील संबंध समजून घेणे महत्वाचे ठरते. महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता या संकल्पना एकमेकांशी जोडल्या गेलेल्या आहेत, एकमेकांशी गुंतलेल्या आणि परस्परपूरक अशा आहेत. महिला सक्षमीकरणासाठी लिंग समानतेचा प्रचार ही प्रथम आणि सर्वात महत्वाची पूर्वअट आहे. त्याच वेळी, लिंग समानतेचा पाठलाग करणे हे स्वाभाविकपणे महिला सक्षमीकरणाची आवश्यकता आहे असे म्हणटल्यास वावगे ठरणार नाही. महिला सक्षमीकरणामुळे समाजातील लिंग भूमिका आज बदलताना दिसतात. सक्षम महिला पारंपारिकपणे पुरुषप्रधान क्षेत्रात प्रवेश करत आहेत, तर पुरुष वाढत्या प्रमाणात घरगुती जबाबदाऱ्या पार पाडत आहेत.

**महिला नेतृत्व विकासात लिंग समानतेचे योगदान आणि महत्व**

लिंग समानता प्रस्थापित झाल्यामुळे महिलांच्या नेतृत्वात खालीलप्रमाणे सकारात्मक बदल घडून येऊ शकतात

१. आत्मविश्वासाची निर्मिती: जेव्हा कुटुंबात आणि समाजात मुलीला मुलाप्रमाणेच वागणूक दिली जाते, तेव्हा तिच्यामध्ये निर्णय घेण्याची क्षमता आणि आत्मविश्वास विकसित होतो. हेच गुण पुढे जाऊन नेतृत्वात रूपांतरित झाल्याचे दिसून येते.

२. शैक्षणिक सबलीकरण: शिक्षण हा नेतृत्वाचा पाया मानला जातो. लिंग समानतेमुळे मुलींच्या शिक्षणावरील गुंतवणूक वाढली आहे, ज्यामुळे तांत्रिक आणि व्यवस्थापकीय क्षेत्रात महिलांची संख्या वाढू लागली आहे.

३. आर्थिक स्वावलंबन: महिलांना देण्यात आलेले समान वेतनाचे अधिकार आणि रोजगाराच्या संधींमुळे महिला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होत आहेत. आर्थिक स्वातंत्र्य हे महिलांना स्वतःचे निर्णय घेण्यास आणि इतरांचे नेतृत्व करण्यास आत्मविश्वास देते.

**भारतात महिला नेतृत्वाची विविध क्षेत्रातील स्थिती संमिश्र आहे:**

**१. राजकीय नेतृत्व:** भारतीय संविधानाने ७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्तीद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ३३% (आता अनेक राज्यांत असलेले ५०%) आरक्षण दिले आहे. यामुळे ग्रामीण भागात महिला राजकारणात धडाडीने येऊ लागल्या व लक्ष घालू लागल्या त्यामुळे आपोआपच 'सरपंच पती' ही संकल्पना मागे पडून खऱ्या अर्थाने महिला नेतृत्व पुढे येत आहे.

**२. कॉर्पोरेट क्षेत्र:** आज जवळपास ५०० पेक्षा अधिक कंपन्यांमध्ये महिला बोर्ड सदस्यांची संख्या वाढत आहे, तरीही उच्च व्यवस्थापनात (C-suite) महिलांचे प्रमाण अजूनही कमी असल्याचे पाहायला मिळते.

**३. स्टार्टअप संस्कृती:** भारतात सध्या महिलांच्या मालकीच्या स्टार्टअप्समध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे पाहायला मिळते. उदा. नायका

**भारतात महिला नेतृत्वासमोरील आव्हाने आणि अडथळे**

लिंग समानता बऱ्याचदाकागदावर दिसून येते, नेतृत्व विकसित होताना मात्र खालील अडथळे येत असतात

**१.दुहेरी ओझे म्हणजेच तारेवरची कसरत:** घरकाम आणि व्यावसायिक जबाबदारी या दुहेरी जबाबदाऱ्यांचा समतोल साधताना महिलांची प्रचंडओढाताण व दमछाक होत असते याचा परिणाम नेतृत्व विकासावर होतो.

**२.सामाजिक रूढी, परंपरांची बंधने:** सामाजिक रूढी, प्रथा, परंपरा आजही महिलांनास्वतःची ओळख निर्माण करून देत नाही किंवा त्यात अडथळे निर्माण करताना दिसतात. 'नेतृत्व करणे हे पुरुषांचे काम आहे' ही मानसिकता अजूनही कायम आहे त्यामुळे महिलांना नेतृत्वाच्या भूमिकेत अजूनही स्वीकारले जात नाही म्हणजे हे प्रमाण अतिशय अत्यल्प आहे.

**३. सुरक्षेचे प्रश्न:** महिलांना अजूनहीकामाच्या ठिकाणी आणि प्रवासात पूर्णपणे सुरक्षितता प्राप्त झालेली नाही. त्यामुळे असुरक्षिततेच्या भावनेने महिलां नेतृत्वाच्या संधी नाकारताना दिसतात.

**भारतात महिला नेतृत्वासाठीउपाययोजना आणि धोरणात्मक शिफारसी**

महिला नेतृत्व अधिक बळकट करण्यासाठी खालील पावले उचलणे गरजेचे आहे

१. अनुभवी महिला नेत्यांनी नवोदित महिलांना मार्गदर्शन करावे. त्यामुळे त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा नवोदित महिलांना होईल.

२. महिलांना जशी प्रसूती रजा (Maternity Leave) मिळते त्याचप्रमाणे पुरुषांना पितृत्व रजा (Paternity Leave) मान्य करून ती अनिवार्य करणे, जेणेकरून संगोपनाची जबाबदारी विभागली जाईल.

३. ग्रामीण भागातील महिला जास्तीत जास्त प्रमाणात तंत्रज्ञानाशी कशा जोडल्या जाऊ शकतात यावर विचार करून तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न करावा.

**भारतातील महिला नेतृत्वाचा प्रवास: ऐतिहासिक ते आधुनिक**

एकंदरीत पहाता भारतामध्ये महिला नेतृत्व ऐतिहासिक काळापासून पाहायला मिळते. भारतातील महिला नेतृत्वाची बीजे १९ व्या शतकातील समाजसुधारणेत सापडतात. महिला नेतृत्वाचा हा प्रवास केवळ सत्तेचा नसून तो 'अस्तित्वाचा' आणि 'अधिकारवाणीचा' आहे.या प्रवासात सर्व प्रथम नाव येते ते

१. **सावित्रीबाई फुले:** शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल एक अग्रणी समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांचे कार्य अतिशय महत्वाचे आहे सावित्रीबाई महिला सक्षमीकरणाच्या एक धर्मयुद्धकर्त्या होत्या कारण त्यांनी सर्व रूढी तोडून महिला शिक्षणाच्या उदात्त कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी आपले आयुष्य खर्ची केले. बहिष्कारापासून वंचित असलेल्यांना हजारो वर्षे गुलाम बनवण्यात आले. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाला गुलामगिरीतून मुक्ततेचे सर्वात मोठे शस्त्र बनवले आहे.

२. **ताराबाई शिंदे:** १८८२मध्ये'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ लिहून त्यांनी पितृसत्ताक पद्धतीवर ताशेरे ओढले व पितृसत्ताक पद्धतीला पहिले वैचारिक आव्हान दिले.

३. पंडितारमाबाई: पंडिता रमाबाई यांनी'शारदा सदन'ची स्थापना करून विधवा आणि निराधार महिलांना स्वावलंबी बनवण्याचे कार्य त्यांनी केले.एका महिलेने केलेली महिला सक्षमीकरणाची सुरवात असे म्हणावे लागेल.

४. झाशीचीराणीलक्ष्मीबाई: १८५७च्यायुद्धात ब्रिटिशांविरुद्ध दिलेला लढा हा महिलांच्या शौर्याचे आणि रणधुरंधर नेतृत्वाचे प्रतीक ठरला. झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचे लष्करी नेतृत्व विशेष महत्वाचे ठरले.

५. **सरोजिनी नायडू :** 'भारतीय कोकिळा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरोजिनी नायडू यांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला आणि त्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या भारतीय महिला अध्यक्ष बनल्या. एक राजकीय नेतृत्व म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल.

६. **डॉ. आनंदीबाई जोशी:** भारताच्यापहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी बनल्या. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत अमेरिकेत जाऊन शिक्षण घेतले आणि महिलांसाठी आरोग्य क्षेत्राची कवाडे उघडली. वैद्यकीय क्षेत्रात भारताचे नेतृत्व करणारी पहिली महिला म्हणून त्यांना ओळखले जाते.

७. **इंदिरा गांधी**: भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधी ओळखल्या जातात. त्यांनी 'पोखरण अणुचाचणी' आणि 'बँकांचे राष्ट्रीयीकरण' यांसारखे अत्यंत धाडसी निर्णय घेऊन जगात भारताची प्रतिमा उंचावली. भारताची आयर्न लेडी म्हणून जागतिक पातळीवर इंदिरा गांधी ओळखल्या जातात.

८. **विजयलक्ष्मी पंडित:** संयुक्त राष्ट्रांच्या (UN) महासभेच्या पहिल्या महिला अध्यक्ष बनण्याचा मानविजयलक्ष्मी पंडित यांना मिळाला होता. विजयलक्ष्मी पंडित यांनी अशा एका कालखंडामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नेतृत्व केले की जिथे महिला शिक्षणाबाबत जागरूक नव्हत्या; त्याचबरोबर सामाजिक,राजकीय क्षेत्रे त्यांच्यासाठी देखील आहेत याची जाणीव त्यांना नव्हती.

९. **किरण बेदी:** पहिल्या महिला आयपीएस अधिकारी बनण्याचा मानकिरण बेदी यांना मिळाला. त्यांनी पोलीस दलात सुधारणा घडवून आणल्या. तिहार जेलमधील सुधारणांसाठी त्यांना विशेष ओळखले जाते.

१०. **सुधा मूर्ती:** २१ व्या शतकातील सामाजिक आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील एक महत्वाचे नेतृत्व इन्फोसिस फाऊंडेशनच्या माध्यमातून शिक्षण आणि समाज सेवेत मोठे योगदान सुधा मूर्ती यांनी दिले आहे. सुधा मूर्ती या साधेपणा आणि बौद्धिक नेतृत्वाचे उदाहरण आहेत.

११. **कल्पना चावला:** अंतराळात जाणारी पहिली भारतीय वंशाची महिला म्हणजे कल्पना चावला.अवकाश विज्ञान हे क्षेत्र महिलांसाठीदेखील आहे याची जाणीव भारतीय महिलांना करून दिली. त्यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मुलींसाठी नवी क्षितिजे खुली केली.

१२. **फाल्गुनी नायर:** फाल्गुनी नायरया 'नायका' च्या संस्थापिका आहेत. फाल्गुनी नायर या भारतातील सर्वात श्रीमंत 'सेल्फ-मेड' महिला उद्योजिका आहेत, त्यांनी स्टार्टअप विश्वात महिलांचे वर्चस्व सिद्ध केले आहे.

१३. **पी.व्ही. सिंधू / मितालीराज:** क्रीडा क्षेत्रात जागतिक स्तरावर भारताचे नेतृत्व करत त्यांनी सिद्ध केले की मैदानावरही महिला 'कॅप्टन' असू शकतात. क्रीडा क्षेत्रातील एक महिला नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहीले जाते.

१४. **प्रतिभाताई पाटील**:घटनात्मक सर्वोच्च पदी म्हणजेच राष्ट्रपती या पदावर विराजमान झालेली पहिली महिला म्हणजे प्रतिभाताई पाटील.

१५. **द्रौपदी मुर्मू:** भारताच्या पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपती. तळागाळातील महिला कशा प्रकारे देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचू शकते, याचे जिवंत उदाहरण म्हणजेद्रौपदी मुर्मू आहेत.

## निष्कर्ष:

भारतामधील महिलांमध्ये नेतृत्व विकसित करण्यात लिंग समानतेचे अत्यंत मोलाचे योगदान आहे. लिंग समानता ही केवळ महिलांना अधिकार देण्यापुरती मर्यादित नसून, ती देशाच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्वाची गुंतवणूक ठरते. जेव्हा एखादी महिला नेतृत्व करते, तेव्हा ती केवळ स्वतःचा विकास करत नाही, तर संपूर्ण कुटुंबाचा आणि समाजाचा स्तर उंचावते. 'लिंग समानतेच्या' पायावर उभारलेले 'नेतृत्व' हे अधिक शाश्वत, शांततापूर्ण आणि प्रगत भारताची निर्मिती करेल एवढे मात्र नक्की.त्यामुळे येणारा काळ हा 'स्त्री-नेतृत्वाचा' असेल याबाबत निश्चितच शंकाच नाही.

## संदर्भ ग्रंथ

१. **Savitribai Phule: The lady who changed the face of women's rights in India https://vikalpsangam.org/article/savitribai-phule-the-lady-who-changed-the-face-of-womens-rights-in-india/**

२. **महिला सक्षमीकरण, भारतातील लैंगिक समानता: इतिहास आणि महत्त्व https://share.google/chIz3WOn4dx0FypjL**

३. **महिला सक्षमीकरणाचे वास्तव https://www.loksatta.com/sampadkiya/women-empowerment-reality-or-myth-1057709/?utm_source=whatsapp&utm_medium=social&utm_campaign=WhatsappShare**

४. **Role of Women in India https://vajiramandravi.com/upsc-exam/role-of-women-in-india/**

५. **https://www.drishtiias.com/daily-updates/daily-news-editorials/role-of-women-in-india-s-growth-story**

६. **https://www.researchgate.net/publication/353444239_Women_Empowerment_theory_practice_process_and_importance**

**७.** डॉ. पुष्पा भावे, लिंगभाव आणि भारतीय समाज, डायमंड पब्लिकेशन्स, दुसरी आवृत्ती, २०१८
८. शर्मिला रेगे, जात आणि लिंगभाव : भारतातील दलित महिलांचे प्रश्न, श्रीविद्या प्रकाशन, सुधारित आवृत्ती,२०१७
९. 'स्त्री-पुरुष तुलना' - ताराबाई शिंदे
१०. प्रमिला संघवी, भारतातील महिला नेतृत्व आणि सक्षमीकरण, मेहता पब्लिशिंग हाऊस, तिसरी आवृत्ती, २०२१